संजय काळे

# स्वर – व्यंजन



# स्वर-व्यंजन

## संजय काळे

ई साहित्य प्रतिष्ठान

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा  त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

**प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान**

**संपर्क --- ९४२२२८४११६**

www. esahity.com

esahity@gmail. com

प्रकाशन ---२७ जुलै २०१७

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता

हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# स्वर-व्यंजन

(एकांकिका )

## लेखक : संजय काळे

(धारपवाडीतील खून, शेवटचा साक्षीदार इत्यादी तूफ़ान गाजलेल्या कादंबऱ्यांचे लेखक)

3, कल्याणीपुष्प,

तुळजाभवानी हौसिंग सोसायटी

गारखेडा, औरंगाबाद- 431005.

मोबाईल नंबर: 09686233218; 07773923082

ई मेल : sanjaykale55@gmail. com

# स्वर-व्यंजन

संजय काळे

- मुलगा दुरावलेल्या आयांना

आणि आई गमावलेल्या मुलांना.

अर्पण

-संजय काळे

स्वरव्यंजन एकांकीका ही स्पर्धेसाठी लिहीली गेलेली आहे. याचा पहिला प्रयोग अभिवादन कल्याण नाटयसंस्थेनी श्री. चारूदत्त भोर यांच्या दिग्दर्शनाखाली सादर केला. पहिल्या प्रयोगात श्री. श्रीरंग दाते आणि मिसेस् प्रीति बोरकर यांनी भूमिका केल्या होत्या. मिसेस बोरकरांनी अतिशय संवेदनशीलतेनं आईची भूमिका सादर केली होती. ती आजही माझ्या स्मरणांत आहे.

तळेगावला झालेल्या 1994च्या एकांकीका स्पर्धेत या एकांकिकेला प्रथम पारितोषक मिळाले होते. सोबत वैयक्तिक सगळया बक्षिसांत वाटा पटकावला होता.



दिग्दर्शकाने पुरूष पात्राला दुहेरी भूमिकेत वापरले ही त्याची कल्पकता.

पहिल्या प्रयोगाच्या सगळया मानकऱ्यांचा मी ऋणी आहे.

## संजय काळे.

या एकांकीकेचे सर्व हक्क डॉ. सौ. रेणूका ऋषीकेश मदनूरकर यांच्याकडे असून पूर्व परवानगी शिवाय एकांकाकीकेचा प्रयोग केल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

पत्रव्यवहाराचा पत्ता:

डॉ. रेणूका ऋषीकेश मदनूरकर

“लक्ष्मीकृपा” 14, देवा नगरी

शहानूरवाडी,औरंगाबाद.

पीनकोड—431005.

madnoorkar.renu@gmail.com

या एकांकिकेतील सर्व नावे,

व्यक्ति आणि स्थळे काल्पनिक

असून त्यांचा कोणत्याही

जिवंत अथवा मृत व्यक्तिशी

साम्य आढळून आल्यास तो

केवळ योगायोग समजावा.

# स्वर-व्यंजन

(पडदा उघडतो तेव्हा रंगमंचावर अंधार. कातरवेळेचा धूसर प्रकाश. एका आरामखुर्चीवर बसलेली आईची आकृती. नामावली संपते. तशी आई निश्चयाने उठते. कोपऱ्यातल्या देवाच्या तसबीरी समोर दिवा लावते. देवाला नमस्कार करते. कागद पेन घेऊन काही मजकूर लिहिते. सावकाश कागद घडी करून ठेवते. मग ड्रावरमधून गोळ्यांची बाटली काढते. हातावर बाटली पालथी करते. ग्लासात पाणी भरून घेते. गोळ्या मुठीने तोंडात टाकणार तेव्हढयात दारावरील बेल वाजते. ती घाईने गोळ्या पुन्हा बाटलीत टाकते. लिहीलेलं पत्र कुठं ठेवावं याचा गोंधळ उडतो. शेवटी बिछान्यावरील उशीखाली ढकलते. तोवर डोअरबेल उतावळेपणाने वाजते. "आले ... आले" म्हणत आई दार उघडते. दारातूनच बोलते. )

आई : कोण पाहीजे?

तरूण : (गोंधळलेला) अं—कुणी नको.. मी... मला.. मी आत येऊ का?

आई : कशाला?

तरूण : कशाला म्हणजे... सहज... सहज म्हणजे माझं जरा काम होतं

आई : माझ्याशी?

तरूण : तुमच्याशी असं नाही. घराशी..

आई : घराशी? हां हां, समजलं. तुम्ही घर बघायला आलात?

तरूण : तसं म्हणा हवं तर. जास्त वेळ थांबणार नाही मी.

आई : माझा मुलगा आल्यावर या. घरात मी एकटी आहे.

तरूण :  नाही. माझ्याकडे वेळ नाही पुन्हा यायला. तुम्ही घाबरू नका. जरा वेळ थांबणार आहे मी. आत आल्यावर सर्व सांगतो.

(ती नाईलाजाने बाजूला सरकते. तरूण आंत येतो. सुस्थितीतला. हालचालीत आत्मविश्वास. आत येऊन भिरभिरत्या नजरेनं सर्वत्र पाहू लागतो. खोलीत एक चक्कर मारतो. जणू काही ओळखीच्या खुणा शोधतो आहे. ती त्याच्याकडे उत्सुकतेने, प्रश्नार्थक बघते. त्याच्या लक्षांत आल्यावर ओशाळं हसतो. )

तरूण :  तुम्हाला आश्चर्य वाटत असेल नाही? म्हणजे काय आहे. पूर्वी आम्ही या घरात राहत होतो.

आई :  कधी?

तरूण :  नक्की सांगता येणार नाही..... मी दहा वर्षांचा असेल तेंव्हा....  म्हणजे वीस एक वर्षांपुर्वी.

आई :  हो का? आम्हालाही इथं येऊन साधारण तेव्हढे दिवस झाले.

तरूण :  मी आणि माझी आई. दोघेच.

आई :  ......  आणि वडील?

तरूण :  माझ्या लहानपणीच ते गेले. मग माझी आई  न् मी मोठ्या घरातून या घरात रहायला आलो..... या लहानशा घरात खुप सुख होतं. मी आणि आई..... रात्री तिचा हात पाठीवरून फिरल्याशिवाय मला कधी झोप आली नाही. आर्थिक ओढग्रस्ती असली तरी समाधान होतं.  परिस्थितीवर मात करण्याची जिद्द मला आईच्या वागण्यातून सतत जाणवायची..  मी मनाशी निश्चय केला....  शिकायचं..... मोठ व्हायचं....  आईला पुन्हा सुखात ठेवायचं....  पण तेही सुख नशिबी नव्हतं. ती कुठल्या तरी असाध्य रोगानं आजारी पडली....  अशाच एका धुसर कातरकाळी....  (जरा वेळ स्तब्धता. ) असं होतं कधी-कधी. सर्वांचेच डाव मनाप्रमाणे पडत नाही.

आई : नशिब एकेकाचं. दुसरं काय? त्यानंतर कुठं गेला तुम्ही.

तरूण :  अनाथाश्रमात.

आई :  (दचकते) कां? नातलग वगैरे?

तरूण :  माहीती नाही. ज्या अर्थी मला न्यायला कुणी आलं नाही त्या अर्थी नसावेत. असते तर भेटायला तरी आले असते, नाही का?

आई :  कुणास ठाऊक?

तरूण :  म्हणजे? (हसतो) त्यांनी माझी जबाबदारी घेतली नसती. पण मला एकदा तरा भेटले असते. शेवटी नातलग आहे मी त्यांचा....  यु नो, ब्लड इज थिकर दॅन वॉटर..... म्हणजे.....

आई :  रक्त पाण्यापेक्षा दाट असतं. शब्दशः भाषांतर. बरोबर?

तरूण :  हो. सॉरी, मला वाटलं.....

आई :  आपल्यालाच जास्त कळतं असं उगीचच पुढच्या पिढीला वाटतं. (तरूण अपसेट झाल्याचं लक्षांत येऊन ती बोलणं सुरू करते. ) सध्या काय करता?

तरूण :  नोकरी. (उत्साहीत) चांगल्या पगाराची नोकरी आहे मला. माझ्या आईचं स्वप्न पूर्ण केलं मी....  स्वप्नं तरी किती मोठी? पण इथवर येईपर्यंत दमछाक झाली....  किती वाईट प्रसंग आले, तरी नीतीमत्ता ढळली नाही. आई म्हणायची, आपली जर उच्च जीवनाची लायकी असेल तर आपण दुय्यम गोष्टी स्वीकारायच्या कशाला? केवळ परिस्थितीची तडजोड म्हणून? परिस्थिती कधीही पालटते. मुला, तुझी लायकी तू सोडू नकोस... बोलण्यात..  वागण्यात... मैत्रीत... जगात... आज नाहीतर उद्या, तुला तुझ्या लायकी प्रमाणे सर्व काही मिळेल....  सर्व काही. आज माझ्याकडे आई सोडून सर्व काही आहे. नोकरी. पैसा. घर. स्थैर्य.

आई :  सर्वांना सगळं मिळतं असं नाही.

तरूण : नाही, तक्रार नाही करायची. तक्रार करायची कुणाची आणि कुणाकडे? (विराम) आज ऑफिसच्या कामासाठी इकडे आलो. आल्यापासून घराची... आईची आठवण एखाद्या बंद घरात कोंडलेल्या वटवाघळा सारखी घिरट्या घालू लागली. दिवस कामात गेला. संध्याकाळी मात्र अस्वस्थता भरून आली. शेवटी ठरवलं. आपल्या जुन्या घराला भेट द्यायची. हा भाग... हे घर .. अजून तसंच असलं तर त्या घरात बसून जरावेळ आईच्या आठवणीत घालवावा... तुम्हाला विचित्र वाटेल पण....

आई : नाही! मी समजू शकते. वियोगात माणसाची खरी किंमत कळते. हवं तितका वेळ बस. मला कसली घाई नाही. वाटल्यास मी बाहेर जाते.

तरूण : त्याची आवश्यकता नाही. तुम्हाला किती मुलं आहेत? तुमचा मुलगा येणार आहे ना?

आई : एक

तरूण : किती मोठा आहे? काय करतो? लग्न झालंय त्याचं? (आई हसते. तो ओशाळतो. ) मला कुटूंब... नातलग यांच्याबद्दल फार कुतूहल वाटतं. असं कुणी भेटलं की मी असा वेडयासारखा प्रश्न विचारत सुटतो.

आई : असू द्या. माझा मुलगा तुमच्याच वयाचा आहे. नोकरी करतो चांगली. लग्नही झालंय त्याचं.

तरूण : लग्नावरून आठवलं. मी लहान असताना पुस्तकातली कविता आईला वाचून दाखविली. कविता आठवत नाही नेमकी पण साधारण आई-मुलाची होती. मुलाची प्रेयसी त्याला आईचं काळीज मागते... त्याचं ऐकतच नाही काही. अगदी हट्ट धरून बसते. मग तो आईचा खून करून काळीज काढतो. प्रेयसीकडे धांवत सुटतो..... ठेचकाळून पडतो. तसं आईच्या काळजातून शब्द येतात, तुला लागलं तर नाहीना बाळ? मी म्हणालो, मी नाही असं वागणार आई तुझ्याशी... अशा दुष्ट स्त्रीशी कधी लग्न करणार नाही.

*(तो स्वताःच्या आठवणीत रंगमंचाला पाठमोरा होतो. त्याचं बोलणं आई ऐकते. ऐकता-ऐकता भूतकाळात जाते. तिचा मुलगा आणि ती. )*

आई : (स्वताःशी) लहान असताना तो असंच म्हणाला होता. लहानपणी आई-वडीलांवर (निष्पाप)विश्वास ठेवणारी मुलं पुढं किती स्वतंत्र होतात..... अलग..... कळतही नाही. अचानक मोठी बनून पुढे उभी राहतात. त्या दिवशी असंच.........

*(प्रकाश योजना बदलते. तरूण वळतो. आता त्याच्या डोळ्यांवर चष्मा नाही. पोश्चर बदललेले. त्याला आईला काहीतरी सांगायचं पण विषयाला तोंड कसं फोडावं ते समजत नाही.)*

मुलगा : आई.....

आई : अं?(तिच्या लक्षांत त्याची अवस्था आली. )

मुलगा : बापू भेटले होते.

आई : हं...

मुलगा : हं काय? तू बोलत नाही.

आई : काय बोलायचं? तुला माझं बोललेलं पटत नाही.

मुलगा : न पटायला काय झालं? पण तू पटेल असं बोल ना.

आई : तू तिचा नाद सोड. अरे नाकापेक्षा मोती जड. आपल्यासारख्याला झेपणार नाही ते स्थळ.

मुलगा : न झेपायला काय झालं? कोणते लखपती लागून गेले. आणि मी काय कमी आहे? तू हो म्हणालीस तर ते येतील ना तुला भेटायला.

आई : आता येतील ना. न यायला काय झालं?

मुलगा : म्हणजे?

आई : म्हणजे काही नाही. मला ती मुलगी पसंत नाही. दुसरी गरीबाची पाहू. वडीलांचं सांगणं आहे, श्रीमंताघरी लेक द्यावी अन् गरीबाची सून करावी.

मुलगा : जुने विचार झालेत आई. आजकाल असं काही राहीलं नाही. माझं तिच्यावर प्रेम आहे. मी तिच्याशिवाय राहू शकणार नाही.

आई : न रहायला काय झालं? इतक्या दिवस काय तीच होती?

मुलगा : तुला कळत कसं नाही आई माझं दुःख. आपल्या मुलावर कुणी प्रेम करतं याचा आनंद वाटायला हवा तूला... पण तू...

आई : वाटला असता रे, पण तू कायमचा सुखी झाला असता तर. माझं ऐक बाळा, तिच्याशी लग्न करून तुला... मला... ह्या घराला.. सुख मिळणार नाही.

मुलगा : कशावरून?

आई : कशावरून काय? आजच ओळखते का मी तिला. माझ्यासमोर लहानाची मोठी झाली. घमेंडी आणि गर्विष्ठ स्वभाव आहे तिचा. तू काय जाणत नाहीस? अनुभव आहे ना तुला?

मुलगा : तेंव्हा ती लहान होती आई, स्वभाव बदलला आता तिचा. तू एकदा भेटून तर घे तिला. तुला हवं ते विचार. (आई स्तब्ध) केंव्हा घेऊन येऊ?(उत्तर नाही) रवीवारी?

आई : (कठोरपणे) तुला माझं ऐकायचं नसेल तर तुला वाटेल ते कर. मला विचारू नकोस.

मुलगा : आई...

आई : हा माझा अंतिम निर्णय. या नंतर हा विषय बंद.

मुलगा : ठीक आहे. तुझा निर्णय ठरला असेल तर माझाही निर्णय ऐक, मी लग्न करीन तर तिच्याशीच नाहीतर आजन्म तसाच राहिल. तुझ्या मनाप्रमाणे होऊ दे. (जातो. )

आई : थांब जाऊ नको. तुझ्यासाठी आहे रे सारं... तुझ्या सुखासाठी.... तूच जर नसला तर.... थांब... जाऊ नको.

*(प्रकाश बदलतो. तो आता चष्मा चढवून तरूण झाला. आई अजून स्वताःतच)*

तरूण : मला काही म्हणालात? माझं लक्ष नव्हतं.

आई : अं.. तुम्हाला काही नाही. बसाना. उभे कां?

तरूण : चालेल ना? उशीर तर होत नाहीना तुम्हाला?

आई : उशीर.... कसला उशीर... छे... म्हणजे? या वयात काय काम असतं? वेळ कसा घालवावा ही चिंता. तुमच्या सारखं कुणी आलं तर बरं वाटतं बोलायला.

तरूण : कां तुमचा मुलगा आहे ना?

आई : आहे ना. पण तो दिवसभर आपल्या कामात.

तरूण : आणि सून? लग्न झालं म्हणालात ना?

आई : तर. फार चांगली आहेत दोघं. अशी मुलगी मिळायला नशिब लागतं.... फार काळजी घेतात माझी या वयात.

तरूण : नातू वगैरे... बाकी एखादा गुलाम घरात असला की म्हातारपणी जगाची गरज वाटत नाही.

आई : आहे तर. एक नातू आहे. सात वर्षांचा. अगदी बापा सारखा दिसतो,चोर. सुटीत आला की मला अगदी सोडत नाही. सारखी आजी लागते.

तरूण : म्हणजे? इथं रहात नाही तो?

आई : (सावरून) शिकायला तिकडेच असतो ना.... पाचगणीला... इंग्रजी शाळेत घातला....

तरूण :  तरीही इतक्या लहानपणी....  आई वडीलांना सोडून... गरज नसताना... माफ करा... मला कदाचित ते तिव्रतेने जाणवत असेल..  त्याच्या आईवडीलांनी विचार करुनच निर्णय घेतला असणार..  मुलाच्या भल्यासाठी... मुलाच्या भल्यासाठी काळजावर दगड ठेवावा लागतो नाही का? मला फारसी माहीती नाही......

आई :  तर आंधळी माया काय कामाची? आपल्याला फार वाटतं....  पण आपल्या हातात काय आहे?

तरूण :  तुमची सून आली नाही अजून? नेहमी असा उशीर होतो?

आई :  (त्याला पुर्ण बोलू न देता) ती येणार नाही. माहेरी गेलेली आहे. तो ही परस्पर तिकडेच गेला. येणार नाहीत दोघेही. मला विचारून गेली ती. मुलगा आला होता ना सांगायला.

*(बोलता बोलता खुर्चीवर बसतो. टेबलावर वाकून लहानपणीची कदाचित् अभ्यासाची आठवण येते. बसतो. प्रकाशयोजना बदललेली. आई तटस्थ, पण टेंशन मध्ये बसलेली. मुलगा येरझारा घालतो. )*

मुलगा :  इतक्या साध्या गोष्टीसाठी भांडलीस तू तिच्याशी? तिला घर सोडायला लावलं?

आई : मी काही म्हटलं नाही. तीच फणकाऱ्याने निघून गेली.

मुलगा : पण तू अडवायला नको होतं कां? तू का जाऊ दिलं?

आई :  तिला कळू नये? लहान आहे कां आता.

मुलगा :  मला तर काय करावं सुचत नाही. इकडे आड इकडे विहीर अशी अवस्था झाली.

आई :  तरी मी आधी बजावलं होतं. तेंव्हा माझ ऐकलं नाही. आता...

मुलगा :  कितीदा तेच तेच बोलणार आहेस? काही फायदा आहे कां त्याचा? की तिला सोडता येणार आहे?

आई :  भलतं बोलू नको. एव्हढी वेळ आली नाही. काही पहिल्यांदा गेली नाही. राहील दोन दिवस माहेरी, येईल परत.

मुलगा :  नाही... आता ते अवघड आहे.

आई :  म्हणजे?

मुलगा :  मी येताना त्यांच्याकडे जाऊन आलो. दुपारी ऑफिसला फोन आला होता तिचा.

आई :  मग... काय म्हणणं आहे तिचं?

मुलगा : तिचं काही नाही....  बापूच बोलले.....

आई : (तणाव) काय?

मुलगा :  हेच. ती लहान आहे अजून. पण तू तर चांगली समजदार आहेस.

आई : लहान असेल त्यांच्याकरीता. इथं तिनं नीट रहायला हवं. कळलं का? सासूची मर्यादा पाळायला हवी.

मुलगा :  पण आई, आपल्याला माहीत आहे ना, तिचा स्वभाव कसा आहे.

आई : (रागावून) सहनशिल स्वभाव असणं म्हणजे काय गुन्हा आहे माझा? मी का म्हणून ऐकून घ्यायचं तिचं? तिचा काय श्रीमंतीचा ताठा तोरा असेल तो तिकडे. माझ्यासमोर बापाची श्रीमंती दाखवण्याची गरज नाही. आणि माझ्या गरीबीचे वाभाडे काढण्याची तर अजिबात गरज नाही. समजलं? बापाच्या माघारी एव्हढयाचा एव्हढा केला तुला... कधी कुणाच्या दारात गेले नाही....  (संतापाने धुमसत रहाते. मुलगा खाली मान घालून उभा)समजावून सांग तिला. सारखं माहेरी जाणं चांगलं नाही. उद्या घेऊन ये तिला.

मुलगा :  पण आई, बापू म्हणाले... पाठवत नाही.

आई :  पाठवत नाही? मग काय आयुष्यभर ठेऊन घेणार?

मुलगा :  नाही... बापू म्हणाले, तू जाऊन तिची समजूत काढली तर....

आई : स्पष्ट सांग ना, मी जाऊन तिचे पाय धरू. जमणार नाही

मुलगा :  रागावू नको आई... किती दिवस चालणार सारं? मी... मी काय करू?

आई : मग मी काय करू? म्हातारपणी तिच्या पुढे-पुढे करू? सांग.

मुलगा : माझं तर डोकंच काम करीत नाही. इकडे तू अशी अडून बसलीस... तिकडे ती... बापूंचं म्हणणं कधी कधी पटत....

आई :  काय....  ?

मुलगा :  हेच. रोजच्या कटकटीपेक्षा वेगळं घर केलेलं काय वाईट

आई : वेगळं घर.....

मुलगा : असं बापू सुचवित होते. त्यांना सांगितलं नाही मी नक्की काही....  म्हणत होते, आमच्यासाठी घर पाहून ठेवलं....  पण मी नकोच म्हणालो....

आई : आमच्यासाठी. आता तुमच्या आम्हीमध्ये आईचा समावेश नाही. आम्ही! नवरा... बायको... मुलगा. शब्दाचे अर्थ सुध्दा वेळे प्रमाणे बदलतात, नाही.

मुलगा :  अजून ठरलं नाही काही, आई. तुला विचारल्या शिवाय काही करील कां मी? मी फक्त तुला बापू काय म्हणले....

आई :  (निर्धार) आपल्या बोलण्यात बापू यायलाच हवे कां? स्वतंत्र निर्णय घेण्याची कुवत निर्माण केली नाही का मी तुझ्यात? तुझा निर्णय काय आहे?

मुलगा : (अवसान गोळा करतो. आई सर्व काही ऐकण्याची तयारी करते) मी भेटायला येत जाईन तुला नियमीत. येथून जवळच आहे ते घर. शिवाय थोडं स्थिर-स्थावर झाल्यावर तुला ही नेता येईल.

आई : ते विसरा. तिचा एव्हढा गर्व असेल तर मी ही स्वाभिमानी आहे. जिवंतपणी तिच्या घरात पाय सुध्दा ठेवणार नाही.

मुलगा : आई!

आई : निघा तुम्ही. निर्णय घेतल्यावर वळून पाहू नये. संयम सुटण्याची भीती असते. या......

*(हंसण्याचा आवाज. जणू तिला कुणी हसतंय. मग लक्षांत येतं, तो तरूण हसतोय. )*

तरूण : तर अशी मजा आली होती. आठवलं की अजून हसायला येतं. हे काय, तुमचं लक्ष नाही? बराच वेळ थांबलो का मी?

आई : नाही... ऐकते मी... बोल तू... आणि हे बघा, माझी काळजी करू नका. तुम्हाला हवं तेव्हढा वेळ थांबा. जेवायला थांबता? मला आनंद वाटेल... खुप दिवसांत हातांनी केलेलं कुणाला आग्रहाने वाढलं नाही. सूनच बघते ना सगळं... थांबता?

तरूण : घरघुती जेवण म्हणजे चैनच माझ्या दृष्टीने. असं आमंत्रण नाकारणं जीवावर येतं अगदी. पण खरं सांगू, तुम्हाला त्रास द्यायला नको वाटतं. या वयात दगदग....

आई : दगदग कसली? समाधान वाटेल मला. थांबता? थांबाच. बसा. पाणी हवंय? पाणी सुध्दा विचारलं नाही मी.

तरूण : हो. पाणी हवंय. जेवायला मात्र एका अटीवर थांबेल.

आई :  कुठल्या

तरूण : मी तुम्हाला मदत करू लागेल. मी आईच्या हाताखाली काम करीत असे. मला फार बरं वाटायचं तिचं काम करताना.

आई : हरकत नाही. (ती आंत जाते)

तरूण : (भावनावश) आणि शेवटच्या स्मृतिला उजाळा दिल्याशिवाय मी जाणार नाही. (बिछान्याकडे जातो. ) इथंच होती तिची शय्या..  मृत्युशय्या..  कुणी नव्हतं अंतिम समयी... फक्त मी, ती आणि संधीकाळ.

*(भावनाप्रधान होऊन बिछान्यावर डोक टेकवतो. आईचा स्पर्श शोधण्यासाठी हात फिरतात. अंथरूणावरील उशी बाजूला सरकते. चिठ्ठी हाताला लागते. वाचतो. धक्का बसतो. ताड्कन उभा रहातो. वळतो. दारात आई शांतपणे उभी. )*

तरूण :  तुम्ही..... (पत्राकडे निर्देश करतो. )

आई :  (कोरडेपणाने) तुझा त्याच्याशी काही संबंध नाही.

तरूण :  मी तुम्हाला असं करू देणार नाही.

आई :  तुमचं काम झालं असेल तर तुम्ही जाऊ शकता.

तरूण :  जाणार नाही. तुमचा काय प्रॉब्लेम आहे? एकदम असा निर्णय? मला सांगा. विश्वास ठेवा माझ्यावर. तुमच्या मुलासारखा समजा.

आई :  मुलासारखा? नाव काढू नका. तुम्ही सारे सारखेच. कृतघ्न. प्रेयसीसाठी आईचे काळीज मागणारे. ऐकायचं तुम्हाला कारण. ऐका. आज सकाळीच तो आला होता. आता तू आहेस तिथंच उभा राहिला आणि मी अशी इथं बसलेली.......

*(प्रकाश बदलतो. आता तरूण तिचा मुलगा झाला आहे. )*

आई : फार दिवसांनी आलास. आजारी होते मध्यंतरी.

मुलगा : निरोप मिळाला मला. दोन दिवस कामात होतो. बंटी आला होता.

आई : इकडे नाही आणलंस?

मुलगा : वेळ कुठे? दोन दिवस राहिला आमच्याकडे. मग सगळे दिवस आजोळीच होता. जायच्या दिवशी उगवला. पुढच्या वेळी नक्की घेऊन येईल.

आई : तरूणपणी असं वाटतं रे. म्हातारपणी पुढची वेळ भरवश्याची नसते. आत्ता जे होईल ते खरं. आणि या आजारानंतर....

मुलगा : काही होत नाही तुला इतक्यात. आई, आता हट्ट पुरे झाला. चल आता माझ्याकडे रहायला.

आई : मी कशाला यायला हवं रे. एव्हढं वाटतं आईबद्दल तर तू ये. हक्काचं घर सोडायचं न् भाड्याच्या घरात मरायला जायचं.

मुलगा : स्वतःचं घर घेण्याचा विचार आहे माझा. नव्या घरात तुझ्यासाठी वेगळी खोली काढू.

आई : म्हणालास एव्हढंच खुप झालं. माझं काय ते आता या घरातच...

मुलागा : पण आई, मला पैशाची आवश्यकता होती. तेंव्हा विचार केला, हे घर विकून....

आई : काय?

मुलगा : नाहीतरी हे घर ठेऊन काय करणार? बापूंनी चांगल्या वस्तीत घर पाहिलं. आपल्या बजेट मध्ये आहे. अशी संधी वारंवार येत नसते. मी हे घर विकण्याचा निर्णय घेतला.

आई : घेतलास ना निर्णय, मग मला विचारायला कशाला आलास? की घर खाली करून घ्यायला आलास?

मुलगा :  उगी आक्रस्ताळेपणा करू नको. तुला मी माझ्याकडे नेईल.

आई :  तुझ्या दारात पाय ठेवणार नाही मी. मी भाड्याच्या घरात मरणार नाही. हे घर सोडणार नाही. समजलं.

मुलगा :  माझ्या सुखाचा जरा विचार कर ग आई. हे बघ, सध्या तुझी मनःस्थिती ठिक नाही. शांतपणे विचार कर. मी पुन्हा उद्या येईल.

*(जातो. रंगमंचावर पुन्हा आई व तरूण. निःशब्द शांतता. )*

आई :  तो निघून गेला पण एक वादळ सोडून गेला. दिवसभर मी वातचक्रात गरगरत होते. हक्काचं घर.... भाड्याचं घर... मुलाचं घर... माझं घर... अस्मिता... अहंकार... कोडगेपणा... मुलाचं सुख... आणि माझा स्वाभिमान. आणि..... आणि माझ्या एकदम लक्षात आलं, मी फक्त दोन पर्यायाचा विचार करीत होते. या प्रश्नाला तिसरं उत्तर आहे.

तरूण :  आत्महत्या?

आई :  माझ्या जीवनाला अर्थ उरला नाही. मरणातून जर माझ्या मुलाचं आयुष्य फुलणार असेल तर.....

तरूण :  भावनेच्या आहारी जाऊन हा निर्णय घेतला तुम्ही. तुम्हाला खरंच वाटतं, जगण्यासारखं काही उरलं नाही?

आई :  ते मला माहीत नाही. मला कशातच गुंतायचं नाही.

तरूण :  ही पळवाट आहे. तुम्ही जगायला हव. आईने जगायला हवं. तुमच्या प्रश्नावर एक तोडगा आहे. तुम्ही माझ्या सोबत चला.

आई :  तुमच्या सोबत? धन्यवाद. कुणाची दया नको मला. सख्ख्या मुलाच्या दारात उभी रहाणार नाही मी. तुमच्या घरी कोणत्या अधिकाराने येऊ?

तरूण : सख्खं. म्हणजे काय हो? मला माहीत नाही म्हणून विचारतो. रक्ताच्या नात्याने, अपघाताने बांधलेली नाती खरी. जाणिवपुर्वक जोडलेली जोपासलेली नाती का निर्माण होऊ नये? आजवर निर्माण झाली नसतील तर आपण निर्माण करू. नात्याला नाव नसलं तरी आईच्या सन्मानाने वागेन मी तुमच्याशी

आई : तरूण वयात भलभलत्या स्वप्नाची भुरळ पडते. पण मुला, अजून तुझं लग्न झालं नाही म्हणून. उद्या तुझी बायको आल्यावर? इतिहासाची पुनरावृत्ती. या वयात पुन्हा-पुन्हा नव्याने सुरवात करायची उमेद नाही,रे. पार खचून जाईल मी.

तरूण : असं होणार नाही. मी होऊ देणार नाही. माझ्या आयुष्यात येणारी व्यक्ति आंधळेपणाने येणार नाही. तुमचं मुलाचं, सुनेचं स्वप्न पुर्ण होईल. तुमची सेवा करताना मला आईची सेवा केल्याचं समाधान मिळेल. माझ्या कडे बघा. माझ्या डोळयात बघा. मी तुमचा तो मुलगा नाही. मी आईचा मुलगा आहे. तुझा मुलगा आहे. मृत आईच्या आठवणी सुध्दा जपणारा. आईला अभिमान वाटावा असा.

आई : तू कशाला आलास रे नेमका या वेळी. सगळे पाश तोडले होते मी. आता पाऊल अडखळलं. (बसते. तो तिच्याकडे उत्सुकतेने पहातो. ती त्याला जवळ बसवते. ) सावली अभावी करपून जाण्याचं वय निघून गेलं तुझं. पण मी समजू शकते तुझ्या मनातलं रितेपण. मी स्वतः भोगतेय ते. मुलगा नोकरीला लागला तेंव्हा मला वाटलं, उन्हाळा संपला. स्वयंपाक घरातील भांड्याचे आवाज... नातवाची किलबिल.. रेडीओ,टि व्हीचा आवाज, वर्तमानपत्राची सळसळ.. छोट्या छोटया गोष्टींतून जिवंत होणारी संध्याकाळ... गजबजलेलं गोकुळ घर. (शांतता) आपण आपली स्वप्न एक-दुसऱ्यात पाहू. पूर्ण करण्याचा प्रयत्न करू. पण.....

तरूण : पण काय?

आई : ज्या दिवशी मला वाटेल माझं तुला ओझं होतं, मी माझा निर्णय घ्यायला मोकळी राहील.

तरूण : तशी वेळच येणार नाही.

आई : ठीक आहे. होऊ दे तुझ्या मनासारखं.

तरूण :  चल तर मग. निघू या.

आई :  घाई काय आहे? उद्या सकाळपर्यंत वेळ आहे आपल्याकडे. रात्र आपण इथंच घालवणार आहोत. एका मुलाच्या लहानपणीच्या गोड आठवणी जागवत.

(तो तिच्या जवळ बसतो. खुप बोलत रहातो. ती त्याच्या कडे कौतूकाने पहात राहते. बोलण्याचा आवाज संगीताच्या आवाजात मिसळतो संगीत टीपेला पोहचते. आणि.... )

## पडदा

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

"Language is the blood of the soul into which thoughts run and out of which they grow."

– Oliver Wendell Holmes


www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा.

किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.